# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र कृषि सेवा पूर्व परीक्षा - २०१६

## वयोमर्यादेत वाढीमुळे अर्ज सादर करण्याच्या दिनांकास मुदतवाढ

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या **महाराष्ट्र कृषि सेवा पूर्व परीक्षा-२०१६** करिता अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २६ एप्रिल, २०१६ असा जाहिर करण्यात आला होता. तथापि, शासनाने शासन निर्णय दिनांक २५ एप्रिल, २०१६ नुसार शासन सेवा प्रवेशाच्या कमाल वयोमर्यादेमध्ये वाढ केली आहे. त्यामुळे शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५ एप्रिल, २०१६ मध्ये नमूद असल्याप्रमाणे, खुल्या प्रवर्गातील वय वर्षे ३८ पावेतो व मागासवर्गीय वय वर्षे ४३ पर्यंतचे उमेदवार आता अर्ज करु शकतात. त्याकरिता खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

(१) विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ४ मे, २०१६** रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

(२) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ५ मे, २०१६** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**सुचिता ज. परब**
उप सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुंबई
दिनांक :- २६ एप्रिल, २०१६